पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८४२ दिनांक - ०२/१२/२०२३**

सिंहगड रोड पोलिस स्टेशन पुणे शहर

## दिवसा घरफोडी करणा-या सराईत आरोपींना अटक करुन ३ लाख २० हजार रु.किंमतीचा मुद्देमाल जप्त.दोन गुन्हे उघड

नोव्हेबर २०२३ मध्ये सिंहगड रोड पोलीस स्टेशनच्या हद्दीत वडगाव या परीसरात दिवसा घरफोडी च्या घटना घडल्या होत्या त्या अनुषंगाने सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे अज्ञात इसमाविरुध्द तक्रार दाखल करण्यात आल्या होत्या.

दाखल गुन्हयातील अज्ञात आरोपीचा सिंहगड रोड पोलीस स्टेशन्‍चे पोलीस अधिकारी व अंमलदार हे बातमीदारामार्फत तसेच तांत्रिक विश्लेषणाद्वारे, सदर परिसरामधील आरोपींचा सखोल तपास करीत असताना सदरचा आरोपी हा मुंबई येथील सराईत घरफोडी चोरी करणारा आरोपी असल्याचे निष्पन्न झाले होते,सदर आरोपीचा मागोवा घेत असताना तपास पथकातील अंमलदार **सागर शेडगे,देवा चव्हाण,अविनाश कोंडे** यांना सदर आरोपी हा रघुनंदन हॉल पुणे मुंबई बेगलोंर हायवेचे सर्व्हिस रोडवर पडीक मोकळ्या जागेच्या समोर सार्वजनिक रोडवर थांबलेला आहे.अशी बातमी मिळाल्याने सदरची बातमी वरिष्ठांना कळविली असता त्यांनी सदर बातमीची खात्री करुन योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिल्याने सपोनि सचिन निकम यांनी सोबतच्या स्टाफ सह सदर ठिकाणी जावुन सापळा रचुन स्टाफचे मदतीने ताब्यात घेवुन त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव व पत्ता **रोहित चेतन शेट्टी वय.२७ वर्षे,रा.०८ एनआर १ आगासन रोड,जवळ शॉपर्स स्टॉप,दिवा ठाणे.सध्या रा.रुम नं.४ हिना पार्क रोड,एचपी पंपाजवळ शिळफाटा,ठाणे** असा असल्याचे सांगितले, त्याचेकडे विचारपुस करता त्याने चोरी केलेले दागिणे त्यांची मैत्रीण नामे आलिझा ताहीर सय्यद वय २२ वर्षे रा.मुंबई हीच्याकडे विक्री करण्यासाठी दिले असल्याचे सांगितले.सदर महीलेस अटक करुन त्यांच्याकडे पोलीस कस्टडी मध्ये तपास करता त्यांनी सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथील दोन गुन्ह्यातील मुद्देमाल मुंबई येथे विक्री केल्याचे सांगितल्याने मुंबई येथे जावुन गुन्ह्यातील ३,२०,०००/- रुपये किंमतीचे ९ तोळे वजनाचे सोन्याचे दागिणे जप्त करण्यात आले आहेत. दाखल गुन्ह्यातील अटक आरोपी नामे रोहीत चेतन शेट्टी यांच्यावर मुंबई व पुणे या शहरात घरफोडीचे एकुण १४ गुन्हे दाखल असुन तो सराईत गुन्हेगार आहे. आरोपीकडुन सिंहगड रोड पोलीस स्टेशन कडील दोन गुन्ह्याची उकल करण्यात आली असुन दाखल गुन्हयाचा पुढील अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक,सचिन निकम सिंहगड रोड पोलीस स्टेशन पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त परीमंडळ ३,श्री.सुहेल शर्मा, मा.सहा पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग,श्री.आप्पासाहेब शेवाळे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.अभय महाजन, पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्री.जयंत राजुरकर, यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक श्री.सचिन निकम,पोलीस उप निरी, गणेश मोकाशी, पोलीस अंमलदार,आबा उत्तेकर,संजय शिंदे,राजु वेगरे,देवा चव्हाण,सागर शेडगे ,अविनाश कोंडे,अमोल पाटील,विकास बांदल,विकास पांडुळे,राहुल ओलेकर,शिवाजी क्षिरसागर,स्वप्नील मगर,दक्ष पाटील यांचे पथकाने केली.


सिंहगड रोड पोलीस स्टेशन
पुणे शहर
सिंहगड रोड पोलीस स्टेशन
तपास पथक पुणे शहर